वर्ष- ११ | अंक- ११ | मुंबई, मंगळवार,२८ जानेवारी ते ०३ फेब्रुवारी २०२५ | पृष्ठ-४
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027

# पोलीस बातमी पत्र
# POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 गर्भवती महिलांनी 'ही' प्रसाधने टाळावी
3 → राष्ट्रीय बालिका दिवस
सायबर गुन्हेगार ते भोजपूरी चित्रपटाचा निर्माता ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## बांगलादेशी नागरिकांवर मोठी कारवाई
# कागदपत्रांचा अक्षरशः ढीग सापडला, काय आहे हा प्रकार



**■ भाईंदर।प्रतिनिधी,**

एकीकडे बांगलादेश नागरिकांच्या वास्तव्याचा मुद्दा गाजत असतानाच आता ठाणे जिल्ह्यात आता बांगलादेशी नागरिकांवर मोठी कारवाई झाली आहे. या प्रकरणात मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने बांगलादेशी नागरिकांचे कोम्बिंग ऑपरेशन सुरु केले आहे. बांगलादेशी नागरिकाने अभिनेता सैफ अली खान याच्या निवासस्थानी शिरकाव करीत त्याच्यावर हल्ला केल्यानंतर बांगलादेशी वस्तीचा मुद्दा प्रचंड गाजत आहे. त्यातच आता ठाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बांगलादेशी नागरिक वस्ती करुन राहात असल्याचे उघड झाले आहे.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला मीरा-भाईंदर आणि वसई-विरार भागात बांगलादेशी नागरिक मोठ्या प्रमाणात राहात असल्याचे गुप्त माहिती मिळाली होती.या पथकाने विविध विभागात छापे टाकून तिघा बांगलादेशी नागरिकांना अटक केली आहे. बांगलादेशी नागरिकांना सुरक्षेतील त्रुटीचा फायदा घेत सीमेवरून भारतात घुसखोरी केल्याचे उघड झाले आहे. त्यांच्याकडील कागदपत्रे बनावट असल्याचे स्पष्ट झाले आहे. हे नागरिक भारतात कामाच्या शोधात आले होते. त्यांनी येथील विविध कारखाने, बांधकाम स्थळे आणि इतर ठिकाणी काम करून आपली गुजराण केली असल्याचे उघडकीस आले आहे.

या बांगलादेशी नागरिकांकडे ओळख सिद्ध करणारी कागदपत्रे आढळून आलेली नाहीत. या घटनेनंतर पोलिसांनी यामागे मानवी तस्करीचे मोठे रॅकेट असण्याची शक्यता वर्तवली आहे. या तीन जणांवर परकीय नागरिक कायदा, 1946 आणि भारतीय दंड संहिता अंतर्गत विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या तिघा आरोपींना न्यायालयात हजर करून न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले आहे.

नागरिकांनी सावध रहावे

बेकायदेशीर परदेशी नागरिकांविरोधात कठोर पावले उचलली जात आहेत. नागरिकांनी सतर्क राहावे, कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा, असे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे. ही कारवाई केवळ मीरा-भाईंदर आणि वसई-विरार परिसरा पुरती मर्यादित नसून, मानवी तस्करी आणि बेकायदेशीर स्थलांतराच्या मोठ्या समस्येकडे लक्ष वेधणारी आहे. पोलीस तपास पूर्ण झाल्यावर या प्रकरणात आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तविण्या येत आहे.

### पुण्यात कागदपत्रांचा ढीग सापडला

पुण्यात देखील बांगलादेशी नागरिकावर कारवाई करण्यात आली आहे. अटक केलेल्या बांगलादेशी घुसखोराकडून बनावट कागदपत्रांचा ढीग सापडला आहे. पुण्यातील स्वारगेट परिसरातील महर्षीनगर मधून या आरोपींना अटक करण्यात आली आहे. या बांगलादेशी घुसखोराकडून बनावट आधार कार्ड, मतदान कार्ड, डेबिट कार्ड यासारखे विविध बनावट कागदपत्रे सापडली असून एहसान हाफिज शेख असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. शेख हा २००४ पासून पुण्यात वास्तव्यास होता अशी माहिती उघडकीस आली आहे. त्याच्याकडे ८ पॅनकार्ड, १५ आधारकार्ड, २ मतदान कार्ड, २ ड्रायव्हिंग लायसन्स, ३ पासपोर्ट, ९ डेबिट कार्ड, ८ क्रेडिट कार्ड जप्त केले आहेत. शेखकडून ३ शाळा सोडल्याचे दाखले, ८ जन्म दाखले हे देखील जप्त केले आहेत. पाकिस्तान, सौदी अरेबिया, कुवैत, कतार, यूएई आणि मलेशिया या देशांच्या चलनी नोटा सुद्धा केल्या जप्त केल्या आहे. पतित पावन संघटना, क्रांतिवीर सेना, सकल हिंदू समाज आदी विविध संघटनेच्या काही कार्यकर्त्यांनी शेख याला पकडून पोलिसांच्या हवाली केले होते. शेख याने बांगलादेशींना कागदपत्रे तयार करुन मदत केल्याचे उघडकीस आले आहे.

## आयएमडीकडून हवामानाचा नवा इशारा जारी




**■ मुंबई।प्रतिनिधी,**

हवामान विभागानं वर्तवलेल्या अंदाजानुसार उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भात तापमानात २ ते ३ अंशांची घट अपेक्षित असल्याचा अंदाज आहे. इथं मुंबई शहर आणि उपनगरांमध्येही पहाटेच्या वेळी मागील दोन दिवसांपासून किमान तापमानात घट होत आहे. शहरात गारठा परतताना दिसत आहे. असं असलं तरीही दुपारच्या वेळी जाणवणारा उष्मा मात्र पाठ सोडताना दिसत नाहीय. पुढील ४८ तास या भागांमध्ये हे चित्र कायम राहण्याची शक्यता आहे. मध्य प्रदेशासह केरळच्या किनारपट्टी क्षेत्रामध्ये कमी दाबाचा पट्टा सक्रिय होत असून, त्यामुळं चक्राकार वाऱ्यांची निर्मिती होताना दिसत आहे. त्यातच उत्तरेकडून सातत्यानं शीतलहरींचा सुरु असणारा मारा आणि पश्चिमी झंझावातामुळं राज्यातील तापमानात लक्षणीय चढ उतार पाहायला मिळत आहे.

# राज्यस्तरीय थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र अभियानाला नाशिक येथून सुरुवात

### आश्रय ट्रस्टच्या माध्यमातुन राज्यभर थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र अभियान राबवले जाणार - डॉ. दिपक मोरेश्वर नाईक (आश्रय ट्रस्ट, विश्वस्त)



दिनांक १९/०१/२०२५ रोजी आश्रय सामाजिक, सांस्कृतिक ,शैक्षणिक ट्रस्ट आणि मराठा विद्या प्रसारक समाज संचलित गुरुवर्य मामासाहेब दांडेकर, भगवंतराव वाझे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सिन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र अभियान राज्यस्तरीय परिषद रावसाहेब थोरात मॅरेथॉन हॉल गंगापूर रोड, जिल्हा नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी मराठा विद्याप्रसारक समाजाचे सरचिटणीस ॲड. नितीन भाऊ ठाकरे व जी. एम. डी कॉलेजचे प्रिन्सिपल ॲड. पी वी रसाळ तसेच कृष्णाजी भगत या मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने सुरुवात करण्यात आली.

विविध जिल्ह्यातील विद्यार्थी वर्ग सकाळी वेळेवर उपस्थित राहून आपले नाव रजिस्टर करीत होते. आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट या सेवाभावी संस्थेचे आदरणीय विश्वस्त डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, आरोग्य विभाग, कार्यकारी सचिव प्राध्यापक श्री प्रकाश पांगम सर संस्थापकिय सचिव सौ. प्रिती दीपक नाईक, सिन्नर महाविद्यालयाचे संस्थापक तसेच उपप्राचार्य, महाविद्यालयाचे प्राध्यापक तसेच विद्यार्थी जण, इतर वेगवेगळ्या महाविद्यालयाचे प्राध्यापक तसेच गुरुवर्य मामासाहेब दांडेकर आणि भगवंतराव वाजे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य श्री पी व्ही रसाळ सर, लेफ्टनंट कर्नल भिसे सर, प्रा. दिपाली सूर्यवंशी तसेच इतर काही आश्रय ट्रस्ट मान्यवर सामाजिक विभाग, कार्यकारी सचिव श्री प्रसन्न पांगम , आश्रय ट्रस्टचे कार्यकारी सचिव श्री गुरुप्रसाद दिपक नाईक, खजिनदार सौ. अश्विनी सागर परब, विश्वस्त सौ. तेजस्वी दुर्गेश मालंडकर, सदस्य श्री विनोद दशरथ मेढे, सामाजिक विभाग कार्यकारी सचिव श्री दिलीप सिंग, कार्यकारी विभाग सचिव श्रेय मांगे, भूषण जोशी, रुपेश थेटे, श्रीमती स्वाती थेटे, आश्रय ट्रस्ट सदस्या, सौ. गौरी गुरुप्रसाद नाईक तसेच सर्व विद्यार्थी जण आवर्जून उपस्थित होते.

सदर कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला. या प्रसंगी बोलताना प्रमुख उद्घाटक ॲड. नितीन ठाकरे यांनी या थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र या आश्रय ट्रस्ट च्या अभियानाला सवोर्तोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. या अभियानासाठी आता पर्यंत एकशे पन्नास शिबीर पूर्ण केलेले आश्रय ट्रस्ट चे पितामह, आरोग्य विभाग-सचिव प्रोफेसर प्रकाश यांनी वयाच्या 75 वर्षापर्यंत 150 शिबिर राबवून अनेक जणांवर मोफत उपचार केल्याचे सांगितले व पुढेही संपूर्ण महाराष्ट्र मुक्त थॅलेसेमिया अभियानामध्ये पुढाकार घेऊन अनेक कॉलेजमध्ये हा कार्यक्रम राबवण्याचे वचन दिले.

सिन्नर कॉलेजचे प्राचार्य ॲड. पि. व्ही. रसाळ यांनी आश्रय ट्रस्ट सोबत पाच वर्षे प्रासंगिक करार करुन आतापर्यंत संपूर्ण वर्षभर मुलांच्या रक्ततपासणीसाठी सहकार्य केले. या कार्यक्रमात अनेक नामवंत तज्ञ डॉक्टरांनी थॅलेसेमिया या विषयावर व्याख्यान दिले. यामध्ये डॉ. सुचिता गंधे, प्रा. जयंत बर्वे, डॉ. सुयंत कर्णिक , डॉ. सई नेमाडे, अल्पिता पाटील, अशा अनेक मान्यवरांचे व्याख्यान झाले. या कार्यक्रमात आश्रय ट्रस्ट च्या सचिव व अन्नपुर्णा कॅटरींग च्या संचालक सौ. प्रिती दिपक नाईक यांच्यावतीने मोफत चहा नाश्ता व जेवणाची सोय अतिशय चांगल्या पध्दतीने आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमांमध्ये थॅलेसेमिया विषयावर आधारीत दोन पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यामध्ये थॅलेसेमिया जनजागृती व रक्तातील बारकावे हे प्रा. प्रकाश पांगम लिखीत पुस्तकाचे उद्घाटन करण्यात आले. या पुस्तकाचे लेखक स्वतः प्रा. प्रकाश पांगम व सहलेखक डॉ. दिपक नाईक हे आहेत. यामध्ये पुस्तकाचे मराठी अनुवाद प्रा. संजय पवार यांनी केले आहे. त्याचप्रमाणे अनेक डॉक्टरांचे मनोगत आपल्या शैलीत लिहून स्मरणिका सह कार्यवाही २०२५ या दुस-या पुस्तकामध्ये सादर करण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये सुमारे १००० विद्यार्थी, सर्व महाविद्यालयांचे प्राध्यापक वर्ग, लॅब टेक्निशियन्स व इतर सर्व प्रकारचे कार्यालयीन व इतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला व कार्यक्रमाची शोभा वाढवली.



# गर्भवती महिलांनी 'ही' प्रसाधने टाळावी



**गर्भारपणाच्या सुरुवातीच्या काळामध्ये काही सौंदर्यप्रसाधने, औषधे महिलांनी आवर्जून टाळायला हवीत, असे वैज्ञानिकांचे म्हणणे आहे. या औषधांच्या किंवा प्रसाधनांच्या वापरामुळे, जन्माला येणाऱ्या बाळाच्या विकासावर अनुचित परिणाम होण्याची शक्यता असल्याचे स्त्रीरोगतज्ज्ञांचे म्हणणे आहे. लिपस्टिक, लिप ग्लॉस, लिप बाम, आय लायनर, मस्कारा, डीओडरंट, फाऊंडेशन, हेअर डाय, इत्यादी सौंदर्यप्रसाधने, त्यांच्यामध्ये वापरल्या गेलेल्या रसायनांमुळे शरीरास नुकसानकारक ठरू शकतात. तसेच रेटीनॉइड्स असलेली प्रसाधने जन्माला येणाऱ्या बाळाच्या विकासासाठी हानीकारक ठरू शकतात. साधारणतः मुरुमे किंवा पुटकुळ्या येण्यापासून रोखण्यासाठी जी क्रीम्स बाजारामध्ये उपलब्ध असतात, त्यामध्ये रेटीनॉइड्स असतात. त्यामुळे गर्भारपणामध्ये या क्रीम्स्चा वापर करू नये.**

ट्रायक्लोसान आणि ट्रायक्लोकार्बन या अँटी बॅक्टेरियल रसायनांचा वापर डीओडरंट्स मध्ये व अंगाला लावण्याच्या साबणांमध्ये केला जातो. या रसायनांमुळे गर्भार महिलेच्या शरीरावर दुष्परिणाम होऊ शकतात. तसेच पॅराबेन्स हे प्रिझर्व्हेटिव्ह तत्त्व साबण, शॅम्पू व कंडिशनर्समध्ये वापरले जाते. त्यामुळे या प्रसाधनांचा वापरही काळजीपूर्वकच करावा. याला उत्तम पर्याय म्हणजे केस धुण्यासाठी शिकेकाई, रिठा यांसारखे नैसर्गिक पदार्थ वापरावेत. तसेच त्वचेची निगा राखण्याकरिताही नैसर्गिक तेलांचा वापर करावा.

फॉर्मलडीहाइड हे रसायनही शरीरास अतिशय घातक असून हे रसायन नेल पॉलिशमध्ये असते. या रसायनाचा प्रजननक्षमतेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. टोल्युएन या रसायनचा वापर नखांना चमकवण्यासाठी होतो. या पदार्थामुळे शरीरातील नर्व्हस सिस्टमवर विपरीत परिणाम होऊ शकतो. थॅलॅटीस हे रसायन जवळ जवळ सर्वच सौंदर्यप्रसाधनांमध्ये असते. या रसायनामुळे शरीरातील होर्मोन्समध्ये असंतुलन निर्माण होण्याची शक्यता असते. सौंदर्यप्रसाधने वापरताना दक्षता बाळगणे चांगले.

# आपल्या स्वयंपाकघरातच आहेत सौंदर्यप्रसाधने



तुमच्या केसांपासून ते पायांच्या नखांपर्यंत सर्व गोष्टींची निगा राखण्यास मदत करण्यासाठी विविध तऱ्हेची सौंदर्यप्रसाधने बाजारामध्ये उपलब्ध आहेत. पण या सर्व प्रसाधनांमध्ये अगदी कमी प्रमाणात का होईना, पण रसायने असतातच. त्यामुळे क्वचितप्रसंगी या सौंदर्यप्रसाधनांमुळे ॲलर्जीदेखील उद्भवू शकते. हा धोका टाळायचा असेल, तर घरी तयार केलेली, नैसर्गिक पदार्थ असलेली प्रसाधने वापरणे कधीपण अधिक सोयीस्कर आणि फायद्याचे असते. घरी प्रसाधने तयार करण्यासाठी थोडाफार वेळ खर्ची घालावा लागत असला, तरी त्यापासून आपल्या त्वचेला किंवा केसांना मिळणारे फायदे पाहता, घरी प्रसाधने तयार करण्यासाठी थोडा वेळ जरूर द्यावा.



**ऑलिव्ह ऑईल :** नैसर्गिक मेकअप रिमूव्हर म्हणून ऑलिव्ह ऑईलचा वापर करावा. मेकअपसाठी वापरण्यात येणाऱ्या सौंदर्यप्रसाधनांमध्ये थोड्या प्रमाणात ॲस्ट्रिंजंट असते, ज्यामुळे आपली त्वचा कोरडी पडू लागते. मेकअप उतरवण्याकरिता ऑलिव्ह ऑईल वापरल्याने मेकअप संपूर्णपणे साफ होतोच, पण त्याशिवाय त्वचेचा कोरडेपणा दूर होऊन, त्वचेला आर्द्रता मिळते.



**टोमॅटो :** त्वचेची निगा राखण्याकरिता प्रत्येक वेळी ब्युटी पार्लरकडे धाव न घेता, घरच्या घरीच उत्तम फेस मास्क तयार करावा. नितळ, सुंदर त्वचेकरिता टोमॅटो अतिशय चांगला पर्याय आहे. टोमॅटोमधील 'अ' जीवनसत्त्व त्वचेवरील डाग हलके करण्यास सहाय्यक आहे. तसेच यामध्ये मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असल्याने त्वचेचा पोत सुधारून, त्वचा चमकदार बनते. हा मास्क बनवण्याकरिता एका टोमॅटोची पेस्ट चेहऱ्यावर लावून वीस मिनिटे राहू द्यावी. त्यानंतर चेहरा थंड पाण्याने धुवावा. या उपायाने त्वचा त्वरित उजळते.

**साखर :** थंडीमध्ये किंवा उन्हाळ्यामध्ये ओठ कोरडे पडून खरखरीत होतात. याचा उपाय आपल्या स्वयंपाकघरामध्ये अगदी सहज उपलब्ध आहे, तो म्हणजे साखर. साखरेमुळे त्वचेवरील मृत पेशी हटवल्या जाऊन, त्वचेमध्ये कोलाजेनचे प्रमाण वाढते. याकरिता एक टीस्पून खोबरेल तेलामध्ये एक लहान चमचा मध मिसळावा. या मिश्रणात दोन मोठे चमचे साखर घालून, मग थोडासा लिंबाचा रस घालावा आणि हे मिश्रण व्यवस्थित एकत्र करावे. ही तयार झालेली पेस्ट ओठांवर हळुवार गोलाकार चोळावी. दहा मिनिटे ही पेस्ट ओठांवर राहू देऊन, त्यानंतर पाण्याने धुवून टाकावी. ओठ टॉवेलने हळुवार कोरडे करून व्हॅसलिन लावावे. या उपायाने ओठ नेहमी मृदू राहतील.

**नारळ :** नारळाच्या दुधामध्ये 'ई' जीवनसत्त्व व केसांना पोषक नैसर्गिक तेले मुबलक मात्रेमध्ये असतात. ॲवोकाडोमध्ये केसांच्या पोषणासाठी आवश्यक प्रथिने व केसाच्या मुळांना पोषक तत्त्वे असतात. नारळाचे दूध व ॲवोकाडो वापरून तयार केलेला मास्क केसांसाठी वापरला असता, केस चमकदार आणि मुलायम बनतात. हा मास्क तयार करण्यासाठी ॲवोकाडो आणि नारळाचे दूध एकत्र करून त्यांची पेस्ट तयार करावी. ही पेस्ट केसांच्या मुळांपासून टोकांपर्यंत व्यवस्थित लावून घ्यावी. अर्धा तास ही पेस्ट केसांवर राहू देऊन त्यानंतर केस धुवावेत. या हेअर मास्कमुळे केसांच्या मुळांना ताकद मिळून, केसांची वाढ चांगली होते.

**मध आणि बदामाची पूड :** हात कोरडे पडून रखरखीत होत असल्यास त्यासाठी मास्क घरच्या घरी तयार करता येतो. एक लहान चमचा मधात थोडा लिंबाचा रस घालावा. त्या मिश्रणामध्ये एक मोठा चमचा बदामाची पूड व एक लहान चमचा अक्रोडची पूड घालावी. अक्रोडची पूड नसल्यास एक चमचा सूर्यफुलाचे तेल घालावे व हे मिश्रण हाताना चोळावे. पाच मिनिटांनी हात गार पाण्याने स्वच्छ धुवून टाकावेत. या उपायाने हात मुलायम राहतील.

मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता. ठाणे- ४०११०१ दुरध्वनी क्र. २८१९२८२८
बांधकाम / विद्युत विभाग

जा.क्र. मनपा / साबां / 5978 / 2024-25
दि. 22/01/2025

// जाहीर नोटीस //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी बसविण्यात आलेल्या वॉटर फाऊंटन देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणेकामी चालु जिल्हा दरसुचीमध्ये दर उपलब्ध नसल्यामुळे खुल्या बाजारातुन दरपत्रक मागविण्यात येत आहे.

सदर कामाकरिता दि. 31/01/2025 रोजी संध्या 4.00 वाजेपर्यंत मिरा भाईदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, बांधकाम विभाग, 4 था मजला येथे स्वारस्य असलेल्या कंत्राटदाराने सोबत जोडलेल्या दरपत्रकातील बाबींकरीता दर भरुन देण्यात यावेत.

सदर कामी विस्तृत माहिती स्थानिक दैनिक वृत्तपत्रात व www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जा. क्र. मनपा/मावज/ई -३९०५९८९/२०२४-२५
दि. २३/०१/२०२५

सही
(नितिन मुकणे)
कार्यकारी अभियंता (साबां/वि)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता. ठाणे- ४०११०१ दुरध्वनी क्र. २८१९२८२८
बांधकाम / विद्युत विभाग

जा.क्र. मनपा / साबां / 6028 / 2024-25
दि. 23/01/2025

// जाहीर नोटीस //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध उद्यानांमध्ये म्युझिक सिस्टीम बसविणेकामी दरपत्रक मागविण्यात येत आहे.

सदर कामाकरिता दि. 31/01/2025 रोजी संध्या 4.00 वाजेपर्यंत मिरा भाईदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, बांधकाम विभाग, 4 था मजला येथे स्वारस्य असलेल्या कंत्राटदाराने सोबत जोडलेल्या दरपत्रकातील बाबींकरीता दर भरुन देण्यात यावेत.

सदर कामी विस्तृत माहिती स्थानिक दैनिक वृत्तपत्रात व www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जा. क्र. मनपा/मावज/ई -३९४५१८८/२०२४-२५
दि. २४/०१/२०२५

सही
(नितिन मुकणे)
कार्यकारी अभियंता (साबां/वि)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# पनीर-पुदिना कटलेट




**साहित्य :** २५० ग्राम ताजं पनीर, १/२ कप शिंगाड्याचे पीठ, २-३ हिरव्या मिरच्या, १/२ चमचा वाळवलेली पुदिन्याची पूड, १/२ चमचा लिंबाचा रस, बारीक चिरलेली कोथिंबीर, उपवासाचे मीठ चवीप्रमाणे.

**कृती :** पनीर कटलेट्स करण्यासाठी सर्वप्रथम पनीरला किसून घ्या. हिरव्या मिरच्यांना बारीक चिरून शिंगाड्याच्या पिठात पनीर आणि मिरच्या घाला. आता उरलेले साहित्य वाळवलेली पुदिन्याची पूड, लिंबाचा रस, मीठ, बारीक चिरलेली कोथिंबीर टाकून त्याला मिक्स करून हवे त्या आकाराचे कटलेट करा. तवा गरम करून त्यावर थोडे तूप किंवा शेंगदाण्याचे तेल टाकून दोन्हीकडून कुरकुरीत खमंग शॅलो फ्राय करून घ्या. तयार कटलेट्सला दही किंवा हिरव्या चटणीसोबत सर्व्ह करा.

# जुन्या मोबाइल फोनचा स्पीड कसा वाढवायचा? जाणून घ्या

**अनेक वर्ष एकच मोबाइल फोन वापरल्यामुळे तो स्लो होऊ शकतो. असा स्मार्टफोन काही ट्रिक्सच्या मदतीने फास्ट करता येतो. यात फॅक्ट्री रीसेट, अँड्रॉइड अपडेट, फोन स्टोरेज क्लियर करणे, लाइट ॲप्सचा वापर इत्यादी ऑप्शन आहेत.**



असे अनेक लोक आहेत जे एक मोबाइल कमीत कमी ३-४ वर्ष वापरतात. विशेषतः मीडिल क्लास कुटुंबात युजर एकच स्मार्टफोन अनेक वर्ष वापरतात. परंतु स्मार्टफोन जुना झाल्यावर त्याची परफॉर्मन्सदेखील स्लो होऊ लागतो. त्यामुळे रोज फोन वापरताना समस्या येऊ लागतात. ही समस्या सोडवण्यासाठी आम्ही काही ट्रिक्स सांगितल्या आहेत ज्यामुळे जुन्या फोनचा स्पीड वाढू शकतो. फॅक्ट्री रीसेटमुळे अनेक समस्या सोडवता येतात. फॅक्ट्री रीसेट तुमच्या स्मार्टफोनला पुन्हा फास्ट, स्मूद व नव्यासारखा बनवण्याची चांगली पद्धत आहे. स्मार्टफोन रीसेट करण्यापूर्वी तुमच्या मोबाइल फोनच्या डेटा बॅकअप घेणं आवश्यक आहे. तुम्ही मोबाइलमधील सर्व ॲप्स, फोटो, व्हिडीओ तसेच अन्य फाईल्स देखील तुमच्या डाटा बॅकअपमध्ये घेऊ शकता. फोन बॅकअप स्मार्टफोनमधील मायक्रोएसडी कार्ड किंवा गुगलमध्ये स्टोर केला जाऊ शकतो, त्यामुळे फोन फॅक्ट्री रीसेट झाल्यानंतर पुन्हा रिकव्हर करता येईल.

**अँड्रॉइड अपडेट**

अँड्रॉइड स्मार्टफोन्स गुगलद्वारे बनवण्यात येणाऱ्या अँड्रॉइड ओएसवर चालतात. ही कंपनी दरवर्षी आपल्या अँड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टमचं नवीन व्हर्जन घेऊन येते ज्यात अनेक नवीन अपडेट असतात. विशेष म्हणजे अँड्रॉइड ओएसचा नवीन अपडेट फक्त नवीन फीचर्स घेऊन येत नाही तर त्यात अनेक बग्स काढले जातात. वेगवेगळ्या ॲप्स, वेबसाइट्स, गेम्स, ऑनलाइन ॲक्टिव्हिटी तसेच इंटरनेट ॲक्सेसमुळे तुमच्या स्मार्टफोनमध्ये अनेक प्रकारचे बग्स देखील येतात त्यामुळे फोनच्या प्रोसेसिंगवर एक्स्ट्रा लोड येतो. हे बग्स फक्त प्रोसेसिंग स्लो करत नाहीत तर अनेक ॲप्सवर देखील प्रभाव टाकतात. अँड्रॉइड अपडेट्समध्ये डेव्हलपर हे बग्स काढून टाकण्याचे कोड टाकतात. त्यामुळे तुमचा स्मार्टफोन कायम नवीन अँड्रॉइड व्हर्जनवर अपडेट करावा.

**फोन स्टोरेज**

फोनची स्टोरेज भरल्यामुळे डिव्हाइसच्या प्रोसेसिंगवर प्रभाव पडतो आणि तो स्लो होतो. Support.google नुसार जर तुमच्या स्मार्टफोनची स्टोरेज ९० टक्क्यांपर्यंत फुल होते तेव्हा फोनमध्ये प्रॉब्लम येण्यास सुरुवात होऊ शकते. अशावेळी तुमच्या फोन स्टोरेज वर लक्ष ठेवावं आणि अनावश्यक फोटोज व व्हिडीओज डिलीट करावे. अत्यावश्यक मीडिया फाइल्सचा इतरत्र बॅकअप घेऊन मोबाइलमधून काढून टाकाव्यात.

**लाइट अँड्रॉइड ॲप्सचा वापर**

लाइट अँड्रॉइड ॲप्स जुन्या मोबाइल फोन्ससाठी उपयुक्त ठरू शकतात. हे ॲप्स फोनमध्ये कमी स्टोरेज वापरतात तसेच जास्त इंटरनेट देखील वापरत नाहीत. असे ॲप्स वापरल्यावर फोनच्या प्रोसेसर व बॅटरीवर देखील जास्त लोड येत नाही. विशेष म्हणजे लाइट अँड्रॉइड ॲप्स फुल व्हर्जनच्या फास्ट असतात. हे लाइट अँड्रॉइड ॲप्स कमी रॅम व जुन्या प्रोसेसरवर देखील स्मूद तसेच लॅगफ्री चालतात. उदा. जीमेल गो, गुगल गो, यूट्यूब गो आणि मॅप्स गो तसेच फेसबुक लाइट, मॅसेंजर लाइट, इंस्टाग्राम लाइट इत्यादी.

## संपादकीय

# राष्ट्रीय बालिका दिवस



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



२४ जानेवारी हा दिवस २००८ सालापासून 'राष्ट्रीय बालिका दिवस' म्हणून देशांमध्ये साजरा केला जातो. मुलींची कमी होणारी संख्या, शिक्षण, पोषण, बालविवाह आणि कायदेशीर हक्क, वैद्यकीय सेवा, संरक्षण आणि सन्मान या मुलींना भेडसावणाऱ्या प्रश्नांच्या संदर्भात जागरूकता वाढवण्यासाठी राष्ट्रीय बालिका दिवस साजरा केला जातो. मुलींचे संरक्षण देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी अशी थीम घेऊन २०१९ मध्ये 'राष्ट्रीय बालिका दिवस' देशभरामध्ये साजरा करण्याचे ठरले. बाल लिंग गुणोत्तर आणि मुलींसाठी निरोगी आणि सुरक्षित वातावरण मिळावे, यासाठी हा विशेष दिवस साजरा करण्याचे ठरले.

आपल्या देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिराजी यांनी २४ जानेवारी १९६६ रोजी पंतप्रधानपदाची सूत्रे घेतली, म्हणून हा दिवस राष्ट्रीय बालिका दिवस म्हणून २००८मध्ये जाहीर करण्यात आला. म्हणजे फक्त मुलींना वाचवणे एवढ्यापुरताच मुद्दा नाही, तर पंतप्रधानपदापर्यंत, राष्ट्रपतीपदापर्यंत जनसामान्य मुलींना जाता यावे. स्वप्न पाहता यावीत. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून देशाच्या विकासामध्ये सहभाग देता यावा. स्वतःची स्वप्न जगता यावीत यासाठी या दिवसाची सुरुवात करण्यात आली.

महिला आणि बालकल्याण मंत्रालयाने राष्ट्रीय बालिका दिनाच्या निमित्ताने सहा उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवली. एक म्हणजे लैंगिक समानतेला प्रोत्साहन देणे. मुलींना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम करणे आणि त्यानिमित्ताने त्यांना चांगले भविष्य देणे. शिक्षणाचा समान हक्क आणि कोणत्याही छळापासून संरक्षण देणे. जेणेकरून हिंसेच्या विरोधात कारवाई करण्याचे स्वातंत्र्य आणि क्षमता मुलींमध्ये आली पाहिजे आणि बालविवाह थांबवला पाहिजे.

भारतीय संविधानाच्या कलम १४ प्रमाणे कायद्यासमोर समानतेचा मूलभूत अधिकार देण्यात आला आहे, तर कलम १५नुसार वंश, धर्म, जातलिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. कलम १६नुसार सार्वजनिक रोजगाराच्या बाबतीत संधीची समानता प्रदान केली आहे, तर कलम १९ भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि व्यवसायाचे स्वातंत्र्य स्त्री-पुरुष दोघांनाही प्रदान करते. कलम २१नुसार जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण आहे. तसेच गोपनीयतेचा अधिकार आहे. कलम ३०० ए प्रमाणे स्त्रियांनाही मालमत्तेचा अधिकार संविधानाने दिला आहे. इतके सारे असूनही 'बेटी बचाव, बेटी पढाव' हा राष्ट्रीय कार्यक्रम हाती घ्यावा लागला. पानिपतवरून प्रधानमंत्र्यांनी हा राष्ट्रीय कार्यक्रम देशाला दिला आणि आम्ही म्हणालो, चला ही तिसरी पानिपतची लढाई तरी आम्ही जिंकू. पण ही तिसरीही लढाई आम्ही हरलो आहे हे जाणवत आहे. महाराष्ट्रातल्या मराठवाड्यासह राज्यात आणि देशात भयावह पद्धतीने मुलींची संख्या कमी होती आहे. इतकेच नाही, तर होणाऱ्या शंभर लग्नांपैकी ३० लग्नं ही देशभरामध्ये बालविवाह आहेत. तेवढ्याच मोठ्या संख्येने लहान वयातील मुलींनी पळून जाणे आणि मुलांचे होणारे अपहरण त्यातही मुलींची अपहरणाची संख्या अधिक आहे. प्रत्येक जिल्ह्याला एक कोटी याप्रमाणे सुरुवातीला ६० जिल्ह्यांमध्ये नंतर १०० जिल्ह्यांमध्ये आणि नंतर संपूर्ण देशभरामध्ये 'बेटी बचाव, बेटी पढाव' हा कार्यक्रम लागू करण्यात आला. हा कार्यक्रम महिला बालकल्याण विभागाकडे त्याच्या सर्व आर्थिक तरतुदींसह देण्यात आला. त्याची जिल्हास्तरावर समिती करण्यात आली. जिल्हाधिकारी त्या समितीचे प्रमुख आहेत. करदात्यांच्या खिशातील पैशातून या राष्ट्रीय कार्यक्रमात कोट्यावधी रुपये खर्च झाले. यातील ५६ टक्क्यांहून अधिक रक्कम जाहिरातीवर खर्च झाली.

२०२१ होणारी जनगणना २०२५ उजाडले तरी झालेली नाही आणि जन्माच्या वेळच्या संख्येनुसार जवळजवळ देशभरातील सर्व तालुक्यांमध्ये आणि जिल्ह्यांमध्ये जन्माच्या वेळी मुलींची संख्या कमी आढळते आहे. याचाच अर्थ बेटी बचाव पूर्णपणे अयशस्वी झाला आहे. इतकेच नाही, तर पढाव हा विषय तर बाजूलाच पडला आहे. पटसंख्या अभावी ग्रामीण भागातील शाळा बंद केल्या जात आहेत. त्याचा सगळ्यात मोठा पहिला परिणाम हा मुलींच्या शिक्षणावर होतो आहे. शिक्षणाच्या गुणवत्तेची तर आपण चर्चाच करत नाही. पण शिक्षकांची उपलब्धता आणि गावामध्ये शाळा असणे हेच आता अवघड बनत चालले आहे. शिक्षणाचे खासगीकरण आणि व्यापारीकरण झाले आहे. त्यामुळे बहुजनांच्या आणि त्यातही ग्रामीण भागातील झोपडपट्टीतील गरीब लोकांच्या मुलींच्या शिक्षणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. बदललेल्या अर्थव्यवस्थेत आणि अवतीभवती होणाऱ्या स्त्रियांच्या संदर्भातील हिंसेमुळे मुलींना त्यातही वयात आलेल्या मुलींना सांभाळणे दिवसेंदिवस पालकांना अवघड होत आहे. त्यामुळे कामावर जाणारे कष्टकरी, कामगार, शेतमजूर, वयात आलेल्या मुलींची बालवयातच लग्न लावत आहेत. कोविडनंतर याच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. मुलींचे वयात येण्याचे वय हे पूर्वी १३ ते १६ होते, ते आता दहा वर्षापर्यंत खाली आले आहे. त्यामुळे मुलगी वयात आली की, तीचे लग्न लावून टाकण्याचे धोरण पालक वर्ग स्वीकारत आहेत. मुळातच मुलींची संख्या कमी झाल्यामुळे लग्नाला मुली मिळत नाहीत, म्हणून मोठ्या वयातील पुरुष लहान वयातील मुलींशी पैसे देऊन लग्न करतायेत, असे निदर्शनाला येते आहे. या सगळ्यामुळे बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीला काहीही अर्थ राहिलेला नाही. लहान वयातल्या मुली लग्न झाल्यामुळे लहान वयातच आई होतात. त्यांच्या पोटी जन्माला येणारी बालक कुपोषित आहेत. त्यामुळे कुपोषण ही आणखीन एक मोठी समस्या आवासून आपणासमोर उभी आहे. आजही जागतिक बँकेकडून पैसे घेऊन आपण अंगणवाडीचा प्रकल्प चालवतो आहे. वषार्नुवर्ष किंबहुना तब्बल ७५ वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरही देशातील महिलांच्या आणि बालकांच्या कुपोषणाचा साधा प्रश्न जर एवढ्या मोठ्या देशाला सोडवता येत नसेल, तर अशा स्वातंत्र्याला आणि अशा प्रजासत्ताकाला काय म्हणावे? राज्यांच्या विधानसभांमध्ये असेल किंवा देशाच्या संसदेमध्ये असेल, अशा प्रश्नांची चर्चा करण्यासाठी संवेदनशीलता आणि वेळ आमच्या लोकप्रतिनिधींकडे नाहीच. त्यांना धमार्चे, जातीचे राजकारण आणि वेगवेगळ्या प्रकल्पाच्या मान्यता आणि त्याच्यातून मिळणारे पैसे आणि त्यातला भ्रष्टाचार हेच अधिक महत्त्वाचे वाटते आहे. देशातील महिला, पुढची पिढीतील बालक, कष्ट करणारे कामगार, आपल्याला अन्न देणारे शेतकरी यांचे प्रश्न आपल्या देशातील लोकप्रतिनिधींना महत्वाचे वाटत नाहीत आणि म्हणूनच २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिवस साजरा करत असताना निम्म्याहून अधिक संख्या असणारी ही स्त्रियांची प्रजा आणि त्यांच्या पोटी जन्माला येणारी बालक यांच्या मानवी हक्काचे, यांच्या संविधानिक हक्काचे, त्यांच्या अस्तित्वाचे, त्यांच्या कुपोषणाचे आणि त्यांच्या भविष्यातील शिक्षण आणि स्वप्नांचा काय? असा प्रश्न तुम्हाला मला विचारावा लागेल. ४२हून अधिक जर मंत्री महाराष्ट्राच्या मंत्रालयात असतील आणि त्यातले २५ मंत्री जर गुन्हेगारी पार्श्वभूमीतून येत असतील, तर या सगळ्याची समज आणि जाणीव या लोकप्रतिनिधींना आपण कशी करून देणार आहे? हा प्रश्न आहे. प्रशासन पूर्णपणे भ्रष्टाचाराने पोखरलेला आहे. न्यायासन फक्त तारीखवर तारीख देत आहे. सामाजिक कार्यकर्त्यांच्या सुरक्षेतेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी लोकांचे संघटन दिवसेंदिवस उभा करणे कठीण होत चालला आहे. कारण जगण्याचीच जनसामान्यांची लढाई दिवसेंदिवस अधिक- अधिक कठीण होत आहे आणि म्हणून आताचा प्रजासत्ताक दिन तुमच्या माझ्यासमोर अनेक आव्हाने घेऊन उभा आहे. त्यातही सगळ्यात महत्त्वाच आव्हान हे पुढची पिढी आणि आपल्या लेकरांचे भवितव्य घडवण्यासाठी आपल्याला विचारशील, कृतीशील व्हाव लागेल. केवळ 'बेटी बचाव बेटी पढाव' अशी घोषणा देऊन चालणार नाही. तर त्या बेटीच्या पोटी पुढची पिढी जन्माला येणार आहे, हा देश घडवणार आहे, याचे भान ठेवून बालिकांच्या आणि स्त्रियांच्या प्रश्नांकडे प्राधान्यक्रमाने लक्ष द्यावे लागेल.

# वास्तववादी आर्थिक सुधारांची प्रतीक्षा!

केंद्र सरकारपुढे सध्या दोन प्रमुख प्रश्न आहेत : (१) वर्षभरासाठी आर्थिक विकासाचा वेग, किमती, रोजगारनिर्मिती इत्यादींचा आराखडा देशासमोर मांडणे. (२) २०४७ मध्ये भारतीय स्वातंत्र्याचा शतक महोत्सव साजरा करताना 'विकसित भारत' ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे. खरे तर, पुढील २२ वर्षांत (२०२५ ते ४७) नक्की काय घडेल, हे सांगणे कठीण आहे. कारण अर्थव्यवस्था आणि आर्थिक धोरणे सतत बदलत असतात. नियोजन प्रक्रिया अस्तित्वात असताना, सरकार पाच वर्षांच्या योजनांद्वारे आकडेवारी आणि उद्दिष्टे सादर करीत असे, त्यामुळे भविष्याचा अंदाज बांधणे सोपे होते. मात्र, योजना आयोगाच्या जागी ह्यथिंक टॅंकह्ण असलेल्या निती आयोगाची स्थापना झाल्यानंतर, अर्थव्यवस्थेच्या वाटचालीचा अचूक वेध घेणे कठीण बनले आहे. आज बाजारातील हेलकावे, जागतिक घडामोडी, आणि देशांतर्गत आर्थिक आव्हाने यांवर अर्थव्यवस्थेचे भवितव्य अवलंबून आहे. अशा स्थितीत 'विकसित भारत' ही संकल्पना स्वप्नवत वाटते. त्यामुळे आशा करू या की येणाऱ्या अर्थसंकल्पांमधून तरी या स्वप्नांना मूर्त स्वरूप देण्यासाठी ठोस धोरणे आणि मार्गदर्शन मिळेल.



### सखोल आणि धाडसी सुधार

पंतप्रधानांनी २३ डिसेंबर २०२४ रोजी, २०२५-२६ च्या अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर निती आयोगाद्वारे आयोजित महत्त्वपूर्ण बैठकीत १९ प्रख्यात अर्थशास्त्रज्ञांना आमंत्रित केले होते. या बैठकीत त्यांनी असे स्पष्ट केले की, भारतीय अर्थव्यवस्था वेगाने प्रगत होण्यासाठी सखोल आणि धाडसी सुधारांची आवश्यकता आहे, आणि यासाठी अर्थशास्त्रज्ञांनी आपल्या सूचना सादर कराव्यात. या बैठकीत अर्थव्यवस्थेच्या मंदावलेल्या गतीसह २०२१-२२ मधील ९.७ टक्क्यांच्या तुलनेत २०२४-२५ मधील ६.४ टक्के वृद्धीदर, नागरी क्षेत्रातील अपेक्षेपेक्षा कमी उपभोग व मागणी, विदेशी व्यापारातील अस्थिरता आणि ट्रम्प प्रशासन आल्यानंतर अमेरिकेकडून आयात कर वाढण्याची भीती; जागतिक स्तरावरील संभाव्य महागाई आणि हवामान बदलाशी संबंधित धोरणात्मक अडथळे इत्यादी मुद्दे होते. लक्षणीय बाब म्हणजे, अर्थव्यवस्थेच्या मंदावलेल्या गतीवर पंतप्रधानांनी चिंता व्यक्त केली असली, तरी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी जुलै -सप्टेंबर २०२४ मधील घटलेला विकासदर ही 'एक क्षणिक पडझड आहे' असे म्हणून ती निरस्त केली होती... यामुळे विरोधाभास अधिकच अधोरेखित होतो व या मुद्द्याचे गांभीर्य वाढते. बैठकीत उपस्थित अर्थशास्त्रज्ञांनी अनेक सूचना केल्या. जमीन व श्रम सुधारणा जलद अमलात आणणे; कारखानदारीसाठी नियमांचे अडथळे दूर करणे; वैयक्तिक उत्पन्न कर कमी करणे; उत्पादनाशी जोडलेली आर्थिक प्रोत्साहन योजना चालू ठेवणे; उत्पादन करात कपात करणे (जेणेकरून उत्पादकांचे नफे वाढतील); महिलांना रोजगार देणाऱ्या कंपन्यांना आर्थिक प्रोत्साहन देणे इत्यादी उपाय सुचविले गेले. रिझर्व्ह बँकेने डिसेंबरमध्ये प्रकाशित 'स्टेट ऑफ द इकॉनॉमी' या अहवालात म्हटले की हवामान बदलासंबंधी भारत सरकारचे धोरण हे अधिक सकस आहे आणि त्याचा लाभ पुढील काळात मिळेल; मात्र नोव्हेंबर २०२४ मध्ये पार पडलेल्या हवामान परिषदेत ठोस निर्णय होऊ शकले नाहीत. विकसित राष्ट्रे या प्रश्नासंदर्भात आपली आर्थिक जबाबदारी टाळत असल्याची भावना जगभर झाली आहे. हवामान बदल हा जागतिक विषय असल्यामुळे या परिस्थितीचाही विचार केंद्राला पुढील विकास धोरणात करावा लागेल. तथापि, चचेर्तील मुद्द्यांवरून अर्थशास्त्रज्ञांनी सुचविलेले उपाय प्रामुख्याने नेहमीच्याच समस्या आणि उपायांभोवती फिरत असल्याचे दिसते. यात 'सखोलपणा आणि धाडसीपणा' कुठे दिसत नाही. पंतप्रधानांच्या मनात काही वेगळे विचार असतील, तर ते आगामी काळात स्पष्ट होतील.

### उत्पादनाच्या मंद गतीची कारणे

केंद्र सरकारच्या अर्थविषयक संस्था जरी 'अर्थव्यवस्थेची मंदगती' नाकारत असल्या तरी प्रत्यक्ष परिस्थिती वेगळेच चित्र दाखविते. रिझर्व्ह बँकेच्या विकासविषयक आशादायक अंदाजांवर केंद्र सरकारने टीका केली आहे. यातून नागरिकांपुढे खरे काय याबद्दल संभ्रम निर्माण होतो. राजकीय फायद्यासाठी सरकार गुलाबी चित्र रंगवते, तर रिझर्व्ह बँकही आशावादी भाकिते करीत वास्तवाकडे दुर्लक्ष करते. एका अभ्यासाप्रमाणे (इंडियन एक्स्प्रेस- १२ डिसेंबर २०२४), गेल्या १५ वर्षांत खासगी क्षेत्रांचे नफे अत्युच्च झाले आहेत. मात्र श्रमिकांचे वेतन हे जवळपास तेवढेच आहे. सगळ्या मोठ्या उद्योगांमध्ये गेली कित्येक वर्षे पगार अतिशय मंद गतीने वाढले, त्यातही किंमतवाढीच्या दरांचा प्रभाव लक्षात घेतला तर वास्तविक वेतनातील वाढ नगण्य किंवा उणे झालेली आहे; त्यामुळे उपभोग आणि मागणी कमी होऊन उत्पादनाचा वेग मंदावला आहे. परिणामी, देशातील उत्पन्न आणि संपत्तीतील विषमता आजपर्यंतच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचली आहे. ही वाढलेली विषमता कमी करण्यासाठी योग्य धोरणे आखून अमलात आणणे हाच खरा सखोल आणि धाडसी सुधार असू शकतो; पण त्याची चर्चा सरकार व इतर वित्तीय संस्थाही करीत नाहीत.

या प्रश्नाच्या जोडीलाच इंडियन एक्स्प्रेसने (२२ डिसेंबर २०२४) रिझर्व्ह बँकेकडून माहितीच्या अधिकारात विचारलेल्या प्रश्नावर उत्तर मिळाले की, २०२० ते २०२४ या कालावधीत २६६४ कंपन्यांची १.९६ लाख कोटी रुपयांची कर्जे थकीत होती. रिझर्व्ह बँकेच्या व्याख्येनुसार या कंपन्या स्वेच्छेने (कर्ज फेडण्याची क्षमता असूनही) थकबाकीदार होत्या. या कर्जांचा भार बँकांवर, ठेवीदारांवर पडतो, तर थकबाकीदार कंपन्या कर्जवसुली होईपर्यंत त्या रकमा वापरत व नफा कमावतच असतात. अर्थातच सरकार बँकांचे 'नॉन परफॉर्मिंग असेट्स' (एनपीए) माफ करण्यासाठी उपाययोजना करते, ज्यामुळे अशा स्वेच्छापूर्ण कर्जबुडव्यांना प्रोत्साहन मिळते, पण अर्थव्यवस्थेवर त्याचा नकारात्मक परिणाम होतो. आणखी एक घातक प्रवृत्ती अशी वाढत आहे. मोठे उद्योजक लहान उद्योगांना विकत घेऊन किंवा स्वतःच अनेक लहान उप-कंपन्या काढून लहान उद्योजकांना दिली जाणारी आर्थिक प्रोत्साहने स्वतःकडे ओढावून घेत आहेत. 'कन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री' च्या (सीआयआय) अहवालानुसार, २०२१-२२ मध्ये मोठ्या कंपन्यांच्या उपकंपन्यांनी लघु उद्योगांसाठीच्या योजनांअंतर्गत २०,००० कोटी रुपयांची कर्जे घेतली. त्याचा थेट परिणाम असा झाला की खऱ्या अर्थाने लहान उद्योजकांना निधी आणि संसाधने अपुऱ्या प्रमाणात मिळाली. लघु उद्योगांसाठी आरक्षित कर्जनिधीपैकी सुमारे ४० टक्के निधी मोठ्या कंपन्यांच्या ताब्यात गेला आहे. यामुळे लघु उद्योजकांना बाजारपेठेत प्रवेश मिळवणे कठीण झाले असून लहान उद्योग करू इच्छिणाऱ्या कारागीर व उद्योजकांमध्ये बेरोजगारी वाढत आहे. जर वरील परिस्थिती कायम राहिली, तर २०४७ साली भारत कितपत विकसित असेल हा प्रश्न शिल्लक राहतो.

### खरे सखोल सुधार

खऱ्या सखोल सुधारांमध्ये शिक्षणावरील खर्च वाढवून ग्रामीण भागातील मुलांनाही गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अधिकार मिळणे आवश्यक आहे; शेतीच्या उत्पादकतेत वाढ; शेतकऱ्यांचे शिक्षण; ग्रामीण औद्योगिकीकरण आणि शोषणमुक्त विपणन; ग्रामीण महिला व युवकांचा रोजगार आणि कौशल्य प्रशिक्षण; खेड्यांची पुनर्रचना, ज्यामुळे दीर्घकाळपर्यंत कारागिरांना रोजगार मिळेल; उत्पन्न विषमता कमी करणे; आरोग्यावर भर देणे; संविधानातील निदेशक तत्त्वे आणि विकासाचा समाजवादी आशय विचारात घेऊन विकासनीती ठरविणे या सखोल आणि धाडसी सुधाराच्या दिशा आहेत. सर्वोच्च न्यायालयानेही घटनेच्या प्रास्ताविकेतील 'समाजवाद' या शब्दाविरुद्ध दाखल केलेल्या याचिकांबाबत २०२४ मध्येच दिलेल्या निकालानुसार मार्गदर्शक तत्त्वे आणि समाजवादी आशय टाळता येणार नाहीत हेच अधोरेखित होते. सध्याची विकासप्रक्रिया ही बाजाराधिष्ठित तत्त्वांवर चालू आहे आणि विकास वरून खाली झिरपत नसल्याचे विषमतेच्या आकड्यांवरून स्पष्ट झाले आहे. मुक्त व्यापारापासून खुद्द अमेरिका व युरोपसुद्धा दूर राहून स्वतःच्या लाभाकडे लक्ष देत आहेत. केवळ खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यांनी सर्वांना सुबत्ता येईल असे (१९९१ ते २०२५) या ३५ वर्षांमध्ये तरी दिसलेले नाही. अंतिमतः विकासाचे मूलभूत उद्दिष्ट मानवी विकास आहे आणि त्यादृष्टीने पंतप्रधान सुधार प्रक्रियेकडे पाहतील अशी अपेक्षा आहे.

## मराठीजनांनो आता तरी जागे व्हा!

'माझी माय मराठी डोक्यावर रत्न जडित मुकुट आणि अंगावर फाटकी वस्त्रे लेवून मंत्रालयाच्या दारात उभी आहे', असे कुसुमाग्रज म्हणजेच वि. वा. शिरवाडकर म्हणाले होते. तो संदर्भ राजभाषेचा होता. मराठी राजभाषा झाली. एवढेच नव्हे आता मराठीला अभिजात भाषेचा दर्जाही मिळाला. मात्र, तीन महिन्यांतील काही घटना पाहिल्या तर महाराष्ट्रातच मराठी भाषेसोबत माणसाची लक्तरे टांगण्याची हिंमत वाढताना दिसत आहे. ते थोपवण्यासाठी वेळीच जागे व्हायला हवे. नवीन वर्ष उजाडले आणि तीन दिवसांतील बातम्यांनी मराठी मन अस्वस्थ झाले. पहिली बातमी मुंब्र्यामधील. २ जानेवारी २०२५ ची घटना. अनेक वर्षे महाराष्ट्रात राहणाऱ्या फळविक्रेत्याला एका मराठी युवकाने मराठीत बोलण्यास सांगितले म्हणून त्याला घेरण्यात आले. त्याने मराठी बोलण्याची सक्ती केली म्हणून त्याला माफी मागण्यास भाग पाडण्यात आले. हे कमी म्हणून की काय याचा व्हिडीओ व्हायरल करण्यात आला.

हेही कमी म्हणून की काय या प्रकरणाची तक्रार करण्यासाठी हा तरुण जेव्हा मुंब्रा पोलीस ठाण्यात गेला, तेव्हा त्याला पोलिसांनी चार तास बसवून ठेवले, इतकेच नाही तर त्याला सोडवण्यासाठी गेलेल्या त्याच्या आईलासुद्धा पोलिसांनी ठाण्यात बसवून ठेवल्याचे तरुणाने माध्यमांना सांगितले. अखेर त्या मुलाने मनसेची मदत मागितली. दुसरी घटना ३ जानेवारीची आहे. पुण्यातील वाकडेवाडीमधील एअरटेलच्या कार्यालयात टीमलीडर शाहबाज अहमदने मराठी कर्मचार्यांना कार्यालयात हिंदीतच बोलण्याची सक्ती केली. शिवाय त्यांचा तीन महिन्यांचा पगारही रखडवून ठेवला होता. अखेर मनसेने त्यांचा इंगा दाखवल्यावर सर्व सुरळीत झाले. तिसरी घटना ४ जानेवारी रोजी घडली. मुंबईतील मरिन लाईन्समधील एक व्यापारी मराठी मुले सूट होत नाहीत, असे सांगत मराठी युवकांना नोकरी नाकारत होता. अखेर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी दट्टया दिल्यानंतर तो सरळ झाला. मराठी मुले सूट होत नाहीत तर महाराष्ट्रातून बाहेर जाऊन धंदे करा असे सुनावल्यावर तो नरमला. महाराष्ट्रात येऊन मराठी माणसाला नाकारणे आणि मराठी भाषेचा अव्हेर करणे, ही फॅशन बनली आहे. अशा घटना घडल्या की कथित राष्ट्रीय मीडिया चूप बसतो आणि एखाद्या परप्रांतीयावर हल्ला झाला असे दाखवले जाते, बिंबवले जाते की जणू महाराष्ट्रात परप्रांतीयांवर अन्याय, अत्याचार होत आहेत. राज्यातील विधानसभेचा निकाल लागल्यानंतरची ही घटना आहे. ३ डिसेंबर २०२४ रोजीची. मुंबईच्या गिरगावमधील एका व्यापाऱ्याने मराठी ग्राहकाकडे मारवाडीत बोल असा हट्ट धरला होता.

त्या ग्राहकाने ही तक्रार मनसेच्या पदाधिकार्यांना सांगितली. त्यावर संतप्त झालेल्या मनसैनिकांनी मनसे स्टाईलने उत्तर दिल्यावर तो सरळ झाला. प्रश्न कुठल्या भाषेत बोल हा नाहीच तर तुम्ही मराठी का नाकारता हा आहे. मराठी ही महाराष्ट्राची मातृभाषा, राज्यभाषा आहे. असे असताना मराठी भाषा नको, अशी बोलण्याची यांची हिंमत होतेच कशी? यासाठी नोव्हेंबर २०२४ मधील पश्चिम रेल्वेतील एका तिकीट तपासनीसाचे (टीसी) उदाहरण एकदम चपखल आहे. या तिकीट तपासनीसाने एका मराठी दाम्पत्याला हिंदीत बोलण्याची सक्ती केली होती.

शिवाय रेल्वेत मराठी बोलणार नाही, असेही या टीसीने त्यांच्याकडून लिहून घेतले होते. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर याबाबत मराठी एकीकरण समितीने निषेध करून नालासोपारा स्टेशनमध्ये ठिय्या आंदोलन केले. त्यानंतर त्या टीसीला निलंबित करण्यात आले. अशी हिंमत या टीसीने दक्षिण भारतातील एखाद्या राज्यात केली असती का? मग ही मंडळी महाराष्ट्रात मराठी भाषेला नाकारून हिंदीची सक्ती कशी करू शकतात, याचे उत्तर मिळायला हवे.

या सर्वांची परिसीमा झाली ती १८ डिसेंबर २०२४ रोजी. 'तुम्ही मराठी माणसं घाण आहात, मटण मच्छी खाता' असे म्हणत राज्य सरकारचा कर्मचारी असलेला अखिलेश शुक्ला याने गुंडांना बोलावून देशमुख या मराठी शेर्जायाला मारहाण केली. कल्याण पश्चिमेकडील योगीधाम परिसरातील अजमेरा हाईट्स इमारतीतील ही घटना आहे. याला निलंबित केल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर अधिवेशनात केली. हा अधिकारी चक्क त्याच्या गाडीवर अंबर दिवा लावून हिंडायचा. ही बाब पोलिसांच्या कधी नजरेस कशी आली नाही, हे मोठे कोडेच आहे. ही घटना ताजी असताना कल्याणमध्येच २२ डिसेंबर रोजी आणखी एक अशीच घटना घडली. मराठी कुटुंबातील अल्पवयीन मुलीशी अश्लील चाळे केल्याचा जाब विचारण्यास गेलेल्या कुटुंबास उत्तम पांडे आणि त्याच्या पत्नीने जबर मारहाण केली. या मारहाणीत मराठी तरुण जखमी झाला असून त्याच्या पत्नीला व आईलाही मारहाण करण्यात आली आहे. या घटनांचे व्हिडीओ काढले जातात, व्हायरल केले जातात. ही घटना उलटी घडली असती तर कथित राष्ट्रीय माध्यमांनी महाराष्ट्राला झोडपून काढले असते, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने लक्ष घातले असते.

# सायबर गुन्हेगार ते भोजपूरी चित्रपटाचा निर्माता

## ३० हून अधिक महिलांची विवाह करण्याच्या अमिषाने फसवणूक करणारे अटकेत

**ठाणे :** विवाह जुळविणाऱ्या संकेतस्थळावरून आणि एका डेटिंग वेबसाईटच्या माध्यमातून महिला आणि पुरूषांची फसवणूक करणाऱ्या दोघांना मुंब्रा पोलिसांच्या पथकाने अटक केली. जैद फुल खान (२४) आणि एजाज इम्तियाज अहमद (३२) अशी अटकेत असलेल्या आरोपींची नावे आहेत. यातील एजाज हा फसवणूकीतून मिळालेल्या पैशांचा वापर भोजपूरी चित्रपटांच्या निर्मितीसाठी करत होता. या दोघांनी टोळी तयार करून ३० महिलांसह ८० जणांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.




मुंब्रा येथे फसवणूक झालेली महिला वास्तव्यास होती. विवाह करण्यासाठी तिने विवाह जुळविणाऱ्या संकेतस्थळावर तिचे खाते बनविले होते. दुसरीकडे जैद आणि एजाज या दोघांनी एक बनावट खाते तयार करून तरुणीसोबत जवळीक वाढविली. त्यानंतर तिला विवाह करण्याचे अमीष दाखविले. तिचा विश्वास बसावा म्हणून जैद याने तिला व्हिडीओ कॉल देखील केला होता. जैद हा सलूनमध्ये काम करायचा. परंतु दिसायला देखणा असल्याने त्याचे समाजमाध्यमावर चाहते मोठ्याप्रमाणात होते. त्याने डायमंडचा हार पाठविल्याचे तरुणीला सांगितले. त्यानंतर तरुणीला डायमंडचा हार सीमा शुल्क विभागात अडकल्याचे सांगून तिच्याकडून १३ लाख ५४ हजार ९८१ रुपये उकळले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर काही महिन्यांपूर्वी पिडीत तरुणीने मुंब्रा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. उपायुक्त सुभाष बुरसे आणि साहाय्यक पोलीस आयुक्त उत्तम कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मुंब्रा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे, पोलीस निरीक्षक नितीन पगार, संजय दवणे, साहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सुरवाडे, पोलीस उपनिरीक्षक विजय सानप यांच्या पथकाने या प्रकरणाचा तपास सुरू केला.

ज्या बँक खात्यात त्यांनी महिलेकडून रक्कम घेतली होती. त्याचा बँक खात्याची माहिती काढून तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे, ९ जानेवारीला जैद याला पोलिसांनी मध्यप्रदेशातील भोपाळमधून अटक केली. त्याच्या अटकेनंतर या प्रकरणातील मुख्य सुत्रधार एजाज असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तो उत्तरप्रदेशातील असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी वेशांतर करून त्याठिकाणी गेले. तिथे तो त्याच्या एका महागड्या मोटारीने त्याठिकाणी आला होता. पोलीस आल्याची चाहूल लागताच तो भरधाव वाहन चालवित तेथून पळ काढू लागला. सुमारे पाच ते सहा किलोमीटर अंतरापर्यंत त्याचा चित्तथरारक पाठलाग करुन पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबूली दिली.

एजाज याने या सायबर गुन्ह्यामधून फसवणूक केलेली रकमेचा वापर भोजपरी चित्रपट निर्मितीसाठी केल्याचे प्राथमिक तपासात समोर येत आहे. काही महिन्यांपूर्वीच त्याने एक चित्रपटाची निर्मिती केली होती. तसेच तो दोन प्रसिद्ध गायकांच्या माध्यमातून एक गाणेही तयार करणार होता.

### अशी केली होती फसवणूक

एजाज आणि जैद यांची ओळख त्यांच्या मैत्रिणीच्या माध्यमातून झाली होती. त्यानंतर त्यांनी सायबर फसवणूकीचे जाळे विणले. त्यांनी विवाह नोंदणी संकेतस्थळावर बनावट खाते तयार केले होते. या माध्यमातून दोघेजण महिलांची फसवणूक करत होते. त्यांनी आतापर्यंत ३० महिलांची फसवणूक केली आहे. भेटवस्तू सीमाशुल्क विभागात अडकल्याचे सांगून त्यांनी महिलांची कोट्यवधी रुपयांना फसवणूक केली आहे. तसेच एजाज याने उत्तरप्रदेशमधील लखनौ भागात कॉलसेंटर उघडले होते. या कॉलसेंटरमध्ये काही महिलांना कर्मचारी म्हणून काम करण्यास ठेवले. पुरुषांची फसवणूक करण्यासाठी त्यांनी क्झोझा नावाचे संकेतस्थळ सुरू केले होते. या संकेतस्थळावर नागरिकांना ह्यहनीट्रॅपह्णमध्ये अडकविले जात होते. त्यांच्याशी अश्लील संभाषण, व्हिडीओ कॉल करुन फसवणूक केली जात होती. या संकेतस्थळाच्या माध्यमातून ५० पुरुषांची फसवणूक झाली असावी असा अंदाज पोलिसांना आहे. त्यादिशेने पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

---

## उल्हासनगरात आणखी २ बांगलादेशी पकडले
## गुन्हे शाखा आणि विठ्ठलवाडी पोलिसांची कारवाई



**उल्हासनगर :** सैफ अली खानवर झालेल्या हल्ल्यानंतर मुंबई महानगर प्रदेशातील बांगलादेशी घुसखोरांचा प्रश्न ऐरणीवर आला असून स्थानिक गुन्हे शाखा आणि पोलिसांच्या झाडाझडतीत अनेक बांगलादेशी छुप्या पद्धतीने कोणत्याही वैध कागदपत्रांशिवाय राहत असल्याचे समोर येते आहे. नुकतेच उल्हासनगरात गुन्हे शाखा आणि विठ्ठलवाडी पोलिसांनी दोन बांगलादेशींना अटक केली असून दोघेही येथे काम करत वास्तव्यास होते.

गेल्या काही दिवसात उल्हासनगर गुन्हे शाखेने विविध कारवाईत १६ बांगलादेशी घुसखोरांवर कारवाई केली होती. विशेष म्हणजे यातील बहुसंख्य बांगलादेशी शहराच्या कोपऱ्यात चाळींमध्ये वास्तव्यास असल्याचे दिसून आले होते. नुकतेच विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या आशेळे गाव येथे पोलिसांनी कारवाई करत आणखी दोन बांगलादेशींना अटक केली आहे. यात उल्हासनगर गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत एका बांगलादेशी महिलेला अटक केली आहे. अटक केलेल्या महिलेचे नाव रुमा बीबी हाफिजुल खान (४०) असे आहे. ती आधी कोलकाता येथे राहत होती. त्यानंतर ती खडेगोवेली परिसरात स्थायिक झाली. पोलिसांनी महिलेला राहण्याची सोय करणाऱ्या घरमालक रफिक विश्वास (४९) याच्याविरुद्धही गुन्हा दाखल केला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली गुप्त माहितीच्या आधारे गुन्हे शाखेने ही कारवाई केली आहे. तर दुसऱ्या कारवाईत आशेळे पाडा येथीलच दर्शना कॉलनी, गोपी कडू चाळ येथे राहणाऱ्या मुनीरूल महीमुद्दीन सरदार (४१) या बांगलादेशीला अटक करण्यात आली आहे. ही कारवाई बेकायदेशीरपणे राहणाऱ्या परदेशी नागरिकांविरुद्ध सुरू असलेल्या मोहिमेचा एक भाग आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

---

## डोंबिवलीत देवीचापाडा येथील जुगार, गांजाच्या अड्डयांमुळे नागरिक त्रस्त



**डोंबिवली :** डोंबिवली पश्चिमेतील देवीचापाडा येथील सत्यवान चौकातील जुगार अड्डा आणि देवीचापाडा येथील खाडी किनारच्या जेट्टीवर गांजा सेवन करणाऱ्यांच्या अड्डयांमुळे स्थानिक रहिवाशांबरोबर शहरातून खाडी किनारी फिरण्यास येणाऱ्या नागरिकांना सर्वाधिक त्रास होत आहे. महिलांना जीव मुठीत घेऊन या भागात फिरावे लागते.

पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या आदेशावरून गैरकृत्यांविरुध्द जोरदार मोहीम सुरू असताना विष्णुनगर पोलीस ठाणे हद्दीतील देवीचापाडा येथील सत्यवान चौकात एक जुगार अड्डा २४ तास सुरू आहे. हा अड्डा सत्यवान चौकातील खंडोबा मंदिर समोरील महालक्ष्मी सुपर मार्केट जवळ आणि दत्तु साई इमारतीजवळ गल्लीत असलेल्या एका मोडक्या चाळीत सुरू आहे. या जुगार खेळणाऱ्यांची वाहने मुख्य रस्त्यावर उभी केलेली असतात. त्यामुळे पादचारी, वाहन चालकांना त्यांचा त्रास होतो. स्थानिक रहिवासी या जुगार अड्डयामुळे त्रस्त आहेत.

या जुगार अड्डयावर येणारे बहुतांशी खेळगडी हे यापुवीर्चे गुन्हेगार, तडीपार गटातील असल्याचे स्थानिक रहिवाशांनी सांगितले. याविषयी उघड बोलले तर जुगार अड्डा चालक त्रास देतील या भीतीने उघडपणे कोणीही रहिवासी याविषयी बोलत नाही. या चाळीवर पोलिसांची धाड पडली तर पाठीमागून पळण्यासाठी चाळीतून एक चोर वाट एका इमारतीच्या आवारातून ठेवण्यात आली आहे, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत अड्डा सुरू असतो, असे देवीचापाडा भागातील रहिवाशांनी सांगितले.

तसेच, देवीचापाडा खाडी किनारच्या गणेशघाट विसर्जन जेट्टीवर गांजा सेवन करणाऱ्यांच्या झुंडी दररोज दुपारी दोन नंतर दाखल होतात. रात्री उशिरापर्यंत ते जेट्टीच्या बाजुला अंत्यविधी कायार्साठी बांधण्यात आलेल्या निवाऱ्यात, बाजुच्या खारफुटीच्या झाडांखाली गांजा सेवन करत बसलेले असतात. याठिकाणी त्यांचा दिवस, रात्री उशिरापर्यंत धिंगाणा असतो, अशा तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. देवीचापाडा खाडी किनारा ठिकाणी सकाळ, संध्याकाळ अनेक महिला, पुरूष निसर्गरम्य परिसर म्हणून कुटुंबीयांसह फिरण्यास येतात. खाडी किनारी गांजा सेवन करणाऱ्यांचे अड्डे असल्याने त्यामुळे नागरिकांना खाडी किनारी जाता येत नाही. महिला वर्ग, ज्येष्ठ नागरिक या अड्डयांमुळे या भागात अलीकडे फिरकत नाहीत, असे समजते.

देवीचापाडा भागातील स्थानिक, काही जाणकार नागरिक या सगळ्या प्रकाराविषयी तीव्र नाराज आहेत. पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या आदेशावरून सर्व पोलीस ठाणे हद्दीत गैरधंदे करणाऱ्यांविरुध्द जोरदार कारवाया सुरू असताना स्थानिक पोलिसांना हे गैरधंदे दिसत नाहीत का असे प्रश्न स्थानिक रहिवासी करत आहेत. पोलीस उपायुक्त झेंडे यांनी सत्यवान चौकातील जुगार अड्डा, देवीचापाडा जेट्टी येथील गांजा अड्डे उध्वस्त करण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी नागरिक करत आहेत.

---



## वसई विरार शहर महानगरपालिका

### प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

मुख्य कार्यालय - विरार

**दुरध्वनी - ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३**

जावक क्र. वविशम /कवि/१२५/२०२४-२५

दिनांक - २१/०१/२०२५

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येहते प्राप्त झालेल्या मालमत्ताधारकाच्या प्रकरण परत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | पावती क्र. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा कर दात्याचे नाव | खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन कर दात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | तुळींज-2 | NL02/860/32 | 5250 | मीना वाहीद खान | इकबालुद्दीन S/O इसरार उद्दीन |
| 2 | तुळींज-2 | NL02/968/64 | 5253 | प्रल्हाद चंद्रकांत कोतवाल | प्रविण काशिराम करंडे व प्रमोद काशिराम करंडे |
| 3 | तुळींज-2 | NL02/905/17 | 5254 | रामपलट तीर्थु जाठ | सुगंधी दिनेश गुप्ता |
| 4 | तुळींज-2 | NL02/159/37 | 5255 | रत्नाकर गोविंद म्हाब्दी | प्रकाश तानाजी यादव |
| 5 | तुळींज-2 | NL02/736/84 | 5269 | मोरे पडवळ | शैला सिताराम गावडे |
| 6 | तुळींज-2 | NL02/612/48 | 5270 | लालुप्रसाद लालचंन्द्र पाल | कलाम खान व शायरुन निशा |
| 7 | तुळींज-2 | NL02/710/16 | 5274 | रियाज अहमद खान हारून इब्राहिम पठाण | माया संजय सिंह |
| 8 | तुळींज-2 | NL02/575/37 | 5280 | बडेलाल राजबळी विश्वकर्मा | हरीन्द्र रामलक्षन पांडेय |
| 9 | तुळींज-2 | NL02/383/53 | 5287 | पप्पु एम मौर्या | प्रदीप ब्रह्मदेव मिश्रा व प्रतिमा प्रदीप मिश्रा |
| 10 | तुळींज-2 | NL02/676/237 | 5292 | प्रकाश ए राहाटे | मधु देवी व प्रमोद राय |
| 11 | तुळींज-2 | NL02/320/27 | 5295 | जयश्री नारायण गोरड | पुनीता प्रजापति |
| 12 | तुळींज-2 | NL02/730/14 | 5299 | झाकिर मसरुफ खान | सुस्नुमा नसरुल्लाह खान |
| 13 | तुळींज-2 | NL02/940/26 | 5305 | बाबा बादशाह कंस्ट्रक्शन | मनिष राजेंद्र गुप्ता |
| 14 | तुळींज-2 | NL02/20/90 | 5307 | खैरुननिशा जाहीर हुसैन खान | प्रशांत विजय सावंत |
| 15 | तुळींज-2 | NL02/944/104 | 5315 | बाळुराम डी सुथार | जयप्रकाश कन्हैयालाल शर्मा |
| 16 | तुळींज-2 | NL02/139/37 | 5318 | धर्मेंद्र अमरदेव मिश्रा | पुनम मनोज चौधरी |
| 17 | तुळींज-2 | NL02/518/38 | 5319 | परशुराम सि शेडगे व शांता शेडगे | गजानन लक्ष्मण पवार |
| 18 | तुळींज-2 | NL02/748/60 | 5331 | नथुराम राजाराम डोंगरे | प्रियंका कुमार घुरुप |
| 19 | तुळींज-2 | NL02/394/20 | 5332 | लिलावती कंस्ट्रक्शन / रामचंद्र रामधनी यादव | जीनत मेहफुज हुसेन |
| 20 | तुळींज-2 | NL02/862/84 | 5334 | शामराव कृष्णा सुर्वे | नीरज मुन्ना सिंह |

**सही /-**

**प्र. सहा. आयुक्त**

**प्रभाग समिती (बी) विरार पूर्व**

**वसई-विरार शहर महानगरपालिका**


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com